# योहानाचे तिसरे पत्र

3 John | with Study Notes

# योहानाचे तिसरे पत्र

## 1

1 मी जो प्राचीन* त्याच्याकडून अति प्रिय गायसाला*, ज्याच्यावर मी खरे प्रेम* करतो. 2 *प्रिय मित्रा, सर्व गोष्टींहून श्रेष्ठ म्हणजे
माझी अशी इच्छा आहे, की जशी तुझी आध्यात्मिक प्रगति होत जाते आहे, तशीच सर्व क्षेत्रांत आणि आरोग्यातही तू सदा स्वस्थ
असावेस. 3 जेव्हा भावांनी* येऊन मला त्या सत्याविषयी सांगितले, जे तुझ्याठायी आहे आणि हे सुद्धा की त्याच सत्याला तू
चिकटून* (स्थिर) आहेस, तेव्हा मला विपुल आनंद* झाला. 4 माझी मुलें* सत्यावर चालून* जीवन जगत आहेत या गोष्टीपेक्षा,
आणखी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीत मला इतका आनंद होणार नाही. 5 प्रिय मित्रा, भावांसाठी व अनोळखी (ओळख नसलेले)
लोकांसाठी तू जे काही करतोस, ते सर्व प्रामाणिकपणाने* करतोस. 6 ख्रिस्ती लोकांसमोर (चर्च) त्यांनी तुझ्या प्रेमाची* साक्ष दिलेली
आहे. जर तू त्यांच्या पुढच्या यात्रेत, त्यांच्याशी चांगला व्यवहार केला तर* बरे होईल*. 7 कारण, ते येशूंच्या नांवासाठी* निघालेले
आहेत आणि ते अविश्वासीं* लोकांपासून काहीही मदत (आर्थिक) घेत नाहीत. 8 म्हणून मित्रा, आपण अशा लोकांचे स्वागतच

---

***1:1*** *"प्राचीन"*- 2योहान 1.

* *"गायसाला"*- पौलाच्या पत्रात आणि प्रेषितांची कृत्यें यांत तीन लोकांचा उल्लेख झालेला आहे, ज्यांची नांवे गायस होती (प्रेषि 19:29). त्या दिवसांत हे एक सामान्य नांव होते आणि म्हणून आपल्याला खात्री नाही की नेमका हा गायस, त्या तीन माणसांपैकी एक होता की, वेगळा.

* *"खरे प्रेम"*- 2 योहान 10

***1:2*** आपल्या आतंरिक जीवनात गायस उत्तम प्रगति करत होता. परंतु असे वाटते की तो काही समस्यांमधून जात होता आणि त्याला काही बाबतीत कष्टांचा सामना करावा लागत होता. कदाचित त्यामुळेच तो शारीरिकरित्या स्वस्थ नव्हता, कष्टांनी त्याचे आरोग्य प्रभावित केले होते. गायसाची खरी गरज योहानाने ओळखली यात शंकाच नाही आणि तो त्याच्याकरता प्रार्थनाही करू लागला.

***1:3*** *"भावांनी"*- अर्थात आतंरिक भाऊ, ख्रिस्तांचे विश्वासी लोक.

* *"सत्याला चिकटून"*- गायस प्रामाणिक आणि निष्ठावान होता, परमेश्वराच्या प्रगटीकरणाविषयी तो प्रामाणिक होता. त्याने सत्य स्वीकारले आणि त्या सत्याच्या अनुरूपच तो जीवन जगत होता.

* *"विपुल आनंद"*- 2 योहान 4.

*1:4 *"माझी मुलें"*- त्याचा अर्थ आहे, आतंरिक मुलें/लेकरें, म्हणजे त्याच्या सेवेद्वारे जे लोक ख्रिस्तांकडे आलेत किंवा ज्यांना त्याने परमेश्वराच्या वचनांचे पौष्टिक भोजन देऊन त्यांचे संगोपन (पालन-पोषण) केले. तुलना 1 तीम 1:2.

* *"सत्यावर चालून"*- 2 योहान 4.

***1:5*** *"प्रामाणिकपणाने"*- परमेश्वराच्या सत्यासंबंधीचा त्याचा प्रामाणिकपणा, त्याचे साहाय्य करत होता तो असा की ज्या कोणत्या प्रकारे तो अनोळखी व ख्रिस्तांच्या सेवकांची मदत करू शकत होता, तो प्रामाणिकपणाने करायचा. जे सत्य त्याने मिळवले होते त्याला सतत चिकटून राहून त्याने ते प्रत्यक्षात उतरवले, त्या सत्याच्या प्रात्यक्षिकाचा सराव त्याने आपल्या जीवनात लागू केला - प्रियांनो हे आपल्यासाठीचे एक आदर्श उदाहरण आहे.

***1:6*** *"प्रेमाची"*- कृतीद्वारे दर्शवलेले प्रेम - 1 योहान 3:16-18.

* *"पुढच्या यात्रेत...तर"*- योहान येथे त्या यात्रेकरूंविषयी बोलतो आहे जे येशूवार्ता प्रचारक आहेत आणि येशूवार्ता गाजवण्यासाठी, जे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करत असतात म्हणजे 'प्रवासी सुवार्तिक'. जेव्हा असे प्रवासी सुवार्तिक, दुसऱ्या जागी येशूवार्ता प्रचाराकरता जात असत, तेव्हा गायस त्यांची आर्थिक मदत व यात्रेकरता लागणारी इतर आवश्यक सामग्री त्यांना उपलब्ध करून देत असे.

* *"बरे होईल"*- स्थानिक चर्चच्या (चर्च) ख्रिस्ती लोकांनी प्रभूच्या सेवकांची सेवा व व्यवहार असाच करावा, जसा परमेश्वराला आवडतो कारण परमेश्वरच त्यांना बोलावतो आणि प्रभूची सेवा करण्याकरता ही विशिष्ट 'प्रभुसेवा' देतो.

***1:7-8*** *"येशूंच्या नांवासाठी"*- त्याचा अर्थ प्रभु येशू ख्रिस्त यांच्या नांवासाठी - सेवेसाठी, असा होता. हे प्रवासी सुवार्तिक स्वतःकरता गेले नव्हते किंवा वैयक्तिक फायद्यासाठीही गेले नव्हते.

* *"अविश्वासीं"*- यावरून स्पष्ट कळते की प्रामुख्याने ते यहूदी लोकांमध्ये नव्हे तर इतर जातीय लोकांमध्ये सेवा करत होते. प्रभूच्या

करावयास हवे; जेणेकरून सत्याच्या प्रसारासाठी आपणास त्यांचे साहाय्यक[*] (सहकारी) होता यावे. [9] मी तेथील लोकांना (चर्च) लिहिले आहे, परंतु दियत्रेफस[*], जो त्या सर्वांमध्ये स्वतःला उंच (मोठा) करू पाहातो, आम्हाला स्वीकारावयास तयार नाहीये. [10] म्हणूनच, मी आल्यावर त्याला त्याच्या कृत्यांची आठवण करून देईन, जी तो वाईट शब्दांसह आमच्या विरूद्ध करतो आहे[*]. इतके करूनही, तो समाधानी नसतो,आणि भावांचे स्वागत तो स्वतःही करत नाही आणि करणाऱ्यांना करूही देत नाही, त्याऐवजी तो त्यांना चर्चच्या बाहेर घालवून देतो[*]. [11] प्रिय मित्रा, वाईट नव्हे तर चांगले कर[*]. जो चांगले करतो[*] तो परमेश्वरापासून आहे[*], पण जो वाईट करतो, त्याने परमेश्वराचा अनुभव केलेला नाहीये. [12] देमेत्रियाची वाहवा-स्तुति सर्व जण करतात आणि होय, आम्ही देखील त्याविषयी[*] साक्ष देतो, तुला ठाऊकही आहे की आमची साक्ष खरी आहे. [13] मला तुला बरेच काही लिहावयाचे होते, परंतु पेन व शाईने लिहिण्याची माझी इच्छा नाही. [14] मी आशा बाळगतो, की मी लवकरच तुला भेटेन. [15] तुला शांति मिळो[*]. आमचे मित्र तुला सलाम सांगतात, तू सुद्धा तेथील मित्रांना त्यांच्या नांवाने सलाम सांग.

---

या सेवकांचा विश्वास होता, की येशूवार्ता गाजवण्यासाठी केवळ ख्रिस्तच त्यांच्या गरजा भागवतील. ज्यामुळे येशूंच्या सत्याचा प्रचार व प्रसार करता यावा. ज्या अविश्वासी लोकांमध्ये ते येशूवार्ता गाजवत होते, त्यांच्याकडून मिळणारी आर्थिक मदत त्यांनी स्वीकारली नव्हती. प्रियांनो जर, चर्चच्या विश्वासींनी अशा सेवकांची मदत केली नसती, तर त्यांना कठीण समस्यांचा सामना करावा लागला असता.

[*] **1:8** *“सत्याच्या...साहाय्यक”*- पाहा, प्रत्येक विश्वासी किंवा सर्व विश्वासी प्रचारक किंवा प्रवासी - सुवार्तिक किंवा मिशनरी होऊ शकत नाही. संपूर्ण जागतिक चर्चने एक हृदय व एकमन होऊन, जे काही ते करू शकतात ते सर्व काही पूर्ण शक्तीने, प्रत्येक रीतिने करावे आणि हे पाहावे व ध्यानात ठेवावे की पृथ्वीच्या पाठीवर एकेकापर्यंत ही येशूवार्ता पोहंचवता यावी; यासाठीच त्यांनी एकतेने प्रयत्न करावयाचे आहे.

[*] **1:9** *“दियत्रेफेस”*- हा एक असा मनुष्य होता, जो इतका उग्र इतका हट्टी, इतका महत्वाकांक्षी व इतका स्वकेंद्रित होता की महान प्रेषित योहानाचेही त्याला ऐकावयाचे नव्हते, नव्हे त्याला त्याचाशी काही काम नव्हते. चर्चमध्ये त्याला ‘एकमात्र अधिकाराचे’ पद हवे होते, एक असा अधिकारी व्हावयाचे होते ज्याच्याकडे प्रत्येकाचे लक्ष जावे, प्रत्येकाने त्याची आज्ञा पाळावी, प्रत्येकाने त्याची हाजीहाजी करावी. वर्तमानकाळी सुद्धा अशी माणसें चर्चमध्ये आढळतात. अशा ‘स्वकेंद्रित - स्वतःकरताच महत्वाकांक्षी’ लोकांविषयी आपण सावध असावे, कारण ते स्वतःसाठी महत्वाकांक्षा बाळगतात, ख्रिस्तांसाठी नाही.

[*] **1:10** *“वाईट शब्दांसह...करतो आहे”*- काही लोकांना वाटते की आपले प्रथम स्थान तयार करण्यासाठी प्रत्येकाला खाली केले जावे, तुच्छ लेखले जावे. दुसऱ्यांचा बहुमान व प्रसिद्धी, आदर नष्ट केला की त्यांचा आदर व लोकप्रियता आपसुकच अधिकाधिक चमकेल असा व्यर्थ विचार असे लोक करतात.

[*] *“चर्चच्या बाहेर...देतो”*- त्याला परमेश्वराच्या सेवकांची मदत करण्यात रस नव्हता; प्रभूचे जे सुवार्तिक, येशूवार्ता प्रसार करत होते त्यांची मदत करण्याची त्याला आवड नव्हती. तो इतरांनाही मदत करू देत नव्हता, कदाचित त्याला अशी भीति होती की हे ‘भाऊ’ त्याला वरचढ होतील, चर्चमध्ये त्यांचे ‘स्वामित्व’ गाजेल!

[*] **1:11** *“वाईट नव्हे... कर”*- 1 करिं 4:16; इफि 5:1; 1 थेस्स 1:6; 2:14; इब्री 6:12; 13:7.

[*] *“करतो”*- तो कोणत्याही एका कृति/कार्याविषयी बोलत नाहीये पण मनुष्याच्या जीवनाच्या शैलीविषयी बोलतो आहे.

[*] *“जो चांगले...आहे”*- अर्थात परमेश्वराने प्रगट केलेली चांगुलपणाची कार्ये, प्रत्यक्ष करत राहणे, जीवनात लागू करणे - 1 योहान 3:7-10.मनुष्याला, त्याच्या विचारानुसार जे चांगले वाटते, ते परमेश्वराच्या दृष्टीने (नजरेत) चांगले नसते (लूक 16:15).

[*] **1:12** *“त्याविषयी”*- दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल - त्याने परमेश्वराचे सत्य प्रत्यक्ष जीवनात लागू केले, म्हणून बायबलच्या सत्यानुसार, तो एक चांगला (सुनाम) मनुष्य होता. परमेश्वराचे वचन प्रत्येकाला, त्याच्या कार्यांवरून सांगत असते की आपण कोण आहोत.

[*] **1:15** *“तुला शांति मिळो”*- योहान 20:19,21,26; रोम 15:33.कोणत्याही प्रकारच्या मूर्तीपूजेपासून आपण सावध असावे.